POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१०२ ● मुंबई, शुक्रवार, १४ नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## दिल्ली स्फोटाचे तार ठाणे जिल्ह्यापर्यंत... मुंब्रामध्ये एटीएसची मोठी कारवाई

# शिक्षकाच्या घरावर छापा, अल-कायदा प्रकरणाशी संबंध असल्याचा संशय

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

दिल्लीतील लाल किल्ला परिसरात आय २० कारमध्ये स्फोट घडवून आणण्यात आला. सोमवारी १० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी हा स्फोट घडवून आणण्यात आला. डॉ. उमर याने आत्मघातकी स्फोट घडवून आणल्याचे प्राथमिक तपासात समोर येत आहे. देशात ६ डिसेंबर रोजी मोठे स्फोट घडवून आणण्याचा कट होता. पण तो अगोदरच उधळल्याने उमरने गडबडीत हा स्फोट केल्याची माहिती समोर येत आहे. या कार स्फोटात १२ हून अधिक निष्पाप नागरिकांचा जीव गेला. याप्रकरणी तपास यंत्रणांनी कसून चौकशी सुरु केली आहे. आता स्फोटाचे तार महाराष्ट्रापर्यंत तर नाही ना याचा तपास सुरू झाला आहे.

**दिल्लीचे स्फोटाचे कनेक्शन ठाण्यापर्यंत?**

दिल्ली येथील लाल किल्ला परिसरातील बॉम्बस्फोटाचे कनेक्शन ठाणे जिल्ह्यापर्यंत तर नाही ना या रोखाने तपास सुरू झाला आहे. ९ सप्टेंबर २०२५ या दिवशी कल्याण येथून आफताब कुरेशी आणि मुंब्रा येथून सुफियान शेख नावाच्या तरुणांना दिल्ली स्पेशल सेलने ताब्यात घेतले होते. कक्क या दहशतवादी संघटनेशी संबंधित कारवायामध्ये सहभाग असल्याच्या आरोपावरून त्यांना ताब्यात घेतले होते.



मिळालेल्या माहितीनुसार, इब्राहिम अबिदी हा मुंब्रा येथील कौसा भागात भाड्याने राहत होता आणि दर रविवारी कुल्यार्तील एका मशिदीत मुलांना उर्दू शिकवत असे. मात्र, त्याच्या वागणुकीबद्दल संशय निर्माण झाल्यानंतर एटीएसने त्याच्यावर लक्ष ठेवले होते. तपासादरम्यान मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अबिदी हा शिक्षकाच्या माध्यमातून काही तरुणांना अतिरेकी विचारांकडे वळवण्याचा प्रयत्न करत असल्याचा संशय आहे.

**१३ जणांचा मृत्यू**

नुकत्याच हाती आलेल्या वृत्तानुसार, दिल्ली स्फोटातील मृतकांचा आकडा वाढला आहे. आता या हल्ल्यात १३ जणांचा मृत्यू झाल्याचे समोर येत आहे. व्हॉईट कॉलर दहशतवाद्यांकडून असे हल्ले करण्याचा डाव जैशने आखल्याचा प्राथमिक अंदाज आहे. जैश-ए-मोहम्मदचा म्होरक्या मौलाना मसूद अझहर याने ऑपरेशन सिंदूरचा बदला घेण्याची धमकी दिली होती. भारताने यावर्षी मे महिन्यात केलेल्या हल्ल्यात त्याचा जावाई आणि इतर नातेवाईक ठार झाले होते. तेव्हापासून तो भारतात अजून हल्ले करण्याच्या तयारीत असल्याचे समोर येत आहे. देशातील जैशची स्लीपर सेल सक्रिय झाल्याचे या स्फोटातून समोर आले आहे.

**दुसऱ्या पत्नीच्या घराचीही झडती**

एटीएसने छापा टाकताना त्याच्या राहत्या घरासह कुल्यार्तील दुसऱ्या पत्नीच्या घराचीही झडती घेतली. या कारवाईदरम्यान अबिदीच्या घरातून अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणे, मोबाईल फोन, लॅपटॉप, आणि काही कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. ही सर्व सामग्री फॉरेन्सिक तपासासाठी पाठवण्यात येणार असून, त्यातून महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता आहे.

**एक्यूआयएस दहशतवादी संघटनेशी संबंध**

एटीएसच्या सूत्रांच्या माहितीनुसार, ही कारवाई पुण्यात उघडकीस आलेल्या अल-कायदा इन इंडियन सबकॉन्टिनेंट या दहशतवादी संघटनेशी संबंधित तपासाचा एक भाग आहे. काही दिवसांपूर्वी पुणे आणि मुंबईतून काही संशयितांना अटक करण्यात आली होती. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारेच मुंब्रा परिसरात ही छापेमारी करण्यात आली असल्याचे सांगितले जात आहे.

सध्या अबिदीची कसून चौकशी सुरू असून, त्याचे संपर्क, सोशल मीडियावरील हालचाली आणि त्याच्याशी निगडित नेटवर्क यांचा तपास सुरु आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे मुंब्रा आणि आसपासच्या परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## राज्यात पुन्हा खळबळ

# पुण्यात आणखी एक मोठा जमीन घोटाळा




■पुणे। प्रतिनिधी,

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्यावर पुण्यातील एका जमिनीशी संबंधित प्रकरणात जमीन घोटाळ्याचा आरोप करण्यात आला आहे, हे प्रकरण राज्यभरात चांगलंच तापलं. पार्थ पवार यांची कंपनी असलेल्या अमेडिया कंपनीशी संबंधित हे प्रकरण आहे. १८०० कोटी रुपये किंमत असलेली जमीन अवघ्या ३०० कोटी रुपयांना खरेदी करण्यात आली. तसेच त्याच्यावर सरकारी नियमानुसार ६ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरणं अपेक्षित असताना केवळ ५०० रुपये इतकीच स्टॅम्प ड्युटी भरण्यात आल्याचं समोर आलं आहे. या प्रकरणामुळे पार्थ पवार चांगलेच अडचणीत सापडले आहेत. दरम्यान हे प्रकरण ताजं असतानाच आता पुणे जिल्ह्यातून आणखी एक जमीन घोटाळा प्रकरण समोर आलं आहे. यामुळे खळबळ उडाली आहे.

मुंढवा आणि बोपोडी जमीन प्रकरणा पाठोपाठ पुन्हा एकदा शासकीय जमीन विक्री घोटाळा समोर आला आहे. ताथवडे येथील १५ एकर शासकीय जागेची परस्पर विक्री करण्यात आल्याचं समोर आलं आहे. पिंपरी चिंचवड शहरातील ताथवडे परिसरातील पशुसंवर्धन विभागाची सर्वे नंबर २० येथील १५ एकर जागेची परस्पर विक्री कोट्यावधी रुपयात करण्यात आली आहे. हेरंब गुपचूप नावाच्या व्यक्तीने जानेवारी २०२५ मध्ये या जागेची विक्री परस्पर केली आहे.

पशुसंवर्धन विभागाला अंधारात ठेवून य जागेची विक्री करण्यात आली आहे. मुद्रांक शुल्क विभागाकडून याबाबतची माहिती जेव्हा पशुसंवर्धन विभागाला कळविण्यात आली. त्यानंतर पशुसंवर्धन विभागाच्या आयुक्तांनी या विषयाची तक्रार पुण्याचे विभागीय आयुक्ताकडे केली आहे. आता या प्रकरणात पुण्याचे विभागीय आयुक्त आणि पशुसंवर्धन विभागाकडून चौकशी सुरू आहे. मात्र पिंपरी चिंचवड शहरातील कोट्यावधी रुपयाची शासकीय मोक्यची जागा या निमित्ताने लाटण्याचा प्रकार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे. आता या प्रकरणाबाबत तपास सुरू आहे.

मोठं शासकीय जमीन घोटाळा प्रकरण समोर आलं आहे. ताथवडे येथील १५ एकर शासकीय जागेची परस्पर विक्री करण्यात आल्याचं समोर आलं आहे. हेरंब गुपचूप नावाच्या व्यक्तीने जानेवारी २०२५ मध्ये या जागेची स्परस्पर विक्री केली आहे, त्यामुळे आता या प्रकरणात नेमकी काय कारवाई होणार हे पहाणं महत्त्वांच ठरणार आहे.

# राज्यात थंडीची लाट! मुंबई, पुण्यासह अनेक जिल्ह्यांमध्ये पारा घसरला... पुढील काही दिवस कशी असणार स्थिती?

**देशभरात हुडहुडी**

केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर आणि प्रामुख्यानं काश्मीरच्या खोऱ्यासह उत्तराखंडच्या पर्वतीय भागांमध्ये थंडीचा कडाका वाढणार आहे. हिमाचलच्या मैदानी क्षेत्रांमध्ये आकाश निरभ्र असलं तरीही लाहौल, स्पितीसारख्या दुर्गम भागांमध्ये मात्र पारा उणे २ अंशांपर्यंत खाली येणार आहे. उत्तर भारताकडील अतीव उत्तरेस असणाऱ्या या प्रांतांमध्ये वाढणारा थंडीच्या कडाक्याचा परिणामामुळे महाराष्ट्रही गारठताना दिसत आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यात थंडीचा कडाका आणखी तीन ते चार दिवस कायम राहणार असून पहाटे गारवा आणि दिवसा वाढलेले तापमान अशी स्थिती पाहायला मिळत आहे. मुंबईत बुधवारी या मोसमातील सर्वात कमी तापमान १८.६ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. जळगावमध्ये किमान तापमान ९.१ अंश सेल्सिअस होते, जे सरासरीपेक्षा ६.२ अंशांनी कमी होते. कमाल आणि किमान तापमानातील मोठी तफावत नागरिकांना जाणवत आहे. मागील काही दिवसांपासून राज्यात थंडीची लाट पसरली आहे. अनेक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. जळगावमध्ये बुधवारी किमान तापमान ९.१ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. हे तापमान सरासरीपेक्षा तब्बल ६.२ अंशांनी कमी होते. याच शहरात कमाल तापमान ३० अंश सेल्सिअस होते. त्यामुळे दिवसा आणि रात्रीच्या तापमानात सुमारे २१ अंशांचा फरक दिसून आला. मुंबईतही थंडीचा कडाका जाणवला. बुधवारी मुंबईत या मोसमातील सर्वात कमी तापमान १८.६ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. नाशिकमध्ये किमान तापमान १०.६ अंश सेल्सिअस होते. पुणे, लोहगाव, अहिल्यानगर, मालेगाव, नाशिक आणि सांगली यांसारख्या शहरांमध्येही कमाल आणि किमान तापमानात १५ ते १६ अंशांहून अधिक फरक होता. बीडमध्ये किमान तापमान ११.५ अंश सेल्सिअस होते, जे सरासरीपेक्षा ५.३ अंशांनी कमी आहे. छत्रपती संभाजीनगर आणि परभणी येथे किमान तापमान अनुक्रमे १३ आणि १३.४ अंश सेल्सिअस होते. या दोन्ही ठिकाणी कमाल तापमान ३१.२ अंश सेल्सिअस होते. विदर्भातही थंडीचा प्रभाव दिसून आला. यवतमाळमध्ये किमान तापमान १०.६ अंश सेल्सिअस होते, जे सरासरीपेक्षा सात अंशांनी खाली उतरले होते. गोंदियातही किमान तापमान १०.५ अंश सेल्सिअस होते. यवतमाळमध्ये कमाल तापमान ३०.४ अंश सेल्सिअस होते, तर गोंदियात ते २८.८ अंश सेल्सिअस होते. ही थंडीची लाट पुढील तीन ते चार दिवस अशीच कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# पुण्यातील कोंढवा भागात दहशतवादी विरोधी पथकाची छापेमारी, एका व्यक्तीची कसून तपासणी

■पुणे। प्रतिनिधी,

दिल्ली बॉम्बस्फोटानंतर संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. महत्त्वाच्या शहरांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. अशातच आता पुण्यातील कोंढवा भागात दहशतवाद विरोधी पथकाने छापेमारी केल्याची माहिती समोर आली आहे. दहशतवाद विरोधी पथकाकडून पुण्यातील एका व्यक्तीची कसून चौकशी करण्यात येत आहे. दहशतवादी जुबेर हंगरगेकर याच्याशी संबंध असल्याच्या संशयावरून ही छापेमारी करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे.

**भागात दहशतवादी विरोधी पथकाची पुण्यात छापेमारी**



दरम्यान, दिल्लीतील स्फोटानंतर व्हाईट कॉलर मॉड्यूल संपूर्ण देशात सक्रीय करण्याची तयारी होती अशी माहिती समोर आली आहे. या हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रणांना अलर्ट जारी करण्यात आला होता. देशातील संवेदनशील ठिकाणी सुरक्षा वाढवण्यात आली आहे. अशातच आता पुण्यातील छापेमारीने खळबळ उडाली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, पुण्यातील कोंढवा भागात दहशतवादी विरोधी पथकाने छापेमारी केल आहे. यावेळी एका व्यक्तीची कसून तपासणी करण्यात येत आहे. या व्यक्तीला अद्याप ताब्यात घेतलेले नाही, मात्र त्याच्या घराची झडती घेण्यात आली आहे. या कारवाईत लॅपटॉप, हार्डडिस्क आणि काही इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस जप्त करण्यात आले आहेत अशा माहितीही समोर आली आहे.

दहशतवादी जुबेर हंगरगेकर याच्या संपर्कात असल्याच्या संशयावरून ही छापेमारी करण्यात आली आहे. संशयित व्यक्तीकडून जप्त करण्यात आलेले इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस फॉरेन्सिक लॅबकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. फॉरेन्सिक लॅबचा अहवाल आल्यानंतर या व्यक्तीचा नेमका कुठल्या व्यक्तीशी आहे हे समोर येणार आहे.

**मुंब्रा येथेही दहशतवादी पथकाचा छापा**

याआधी दहशतवादी विरोधी पथकाने मुंब्रा येथील कौसा विभागामध्ये राहणाऱ्या एका शिक्षकाच्या घरी धाड टाकली होती. या कारवाईत अधिकाऱ्यांनी त्याच्या घरातले मोबाईल आणि काही इलेक्ट्रॉनिक वस्तू जप्त केल्या आहेत. सदरचा शिक्षक हा जमात ये इस्लाम या संघटनेशी संबंधित असल्याचे समोर आले आहे, मात्र या व्यक्तीचे नाव काय आहे ह अद्याप समोर आलेले नाही. पोलीस आणि तपास अधिकारी या सर्व प्रकरणांचा तपास करत आहेत.

# मनसेच्या बड्या नेत्याच्या भावाची ईडीकडून १० तास चौकशी

■ठाणे। प्रतिनिधी,

मनसेचे नेते आणि माजी आमदार राजू पाटील याचे भाऊ विनोद पाटील यांची ईडीकडून तब्बल १० तास झाली चौकशी करण्यात आली आहे. सकाळी सात ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत विनोद पाटील यांची चौकशी सुरू होती. दरम्यान पुन्हा एकदा आणखी ईडीकडून विनोद पाटील यांची चौकशी होणार असल्याची माहिती समोर येत आहे. विनोद पाटील यांना चौकशीसाठी ईडी कार्यालयात बोलावलं जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. लोढा ग्रुपचे विश्वस्त फसवणूक प्रकरणात ही चौकशी करण्यात आली आहे. लोढा गृपचे माजी संचालक राजेंद्र लोढा आणि विनोद पाटील यांच्यासह दहा जणांवर या प्रकरणात गुन्हा दाखल होता, या प्रकरणाची मुंबई आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी सुरू आहे, त्यानंतर आता या प्रकरणात इडीची एन्ट्री झाली असून, आज विनोद पाटील यांची इडीकडून देखील चौकशी करण्यात आली आहे. विनोद पाटील यांची इडीकडून आज तब्बल दहा तास चौकशी करण्यात आली, दरम्यान पुन्हा एकदा इडीकडून विनोद पाटील यांची चौकशी होणार असून, त्यासाठी त्यांना ईडीच्या कार्यालयात बोलावण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे. लोढा ग्रुपचे विश्वस्त फसवणूक प्रकरणात ही चौकशी करण्यात आली आहे. लोढा गृपचे माजी संचालक राजेंद्र लोढा आणि विनोद पाटील यांच्यासह दहा जणांवर या प्रकरणात गुन्हा दाखल होता, मुंबई आर्थिक गुन्हे शाखेनंतर आता इडीकडून देखील चौकशी सुरू झाली आहे. राजेंद्र लोढा यांनी केलेल्या जमीन आणि टीडीआर आर्थिक गैरव्यवहाराबाबत ही चौकशी सुरू आहे. लोढा ग्रुपचे विश्वस्त यांचा विश्वासघात आणि फसवणूक प्रकरणी राजेंद्र लोढा यांच्या नंतर आता विनोद पाटील यांचा देखील समांतर तपास ईडीकडे आला आहे. ईडीचं पथक विनोद पाटील यांचा जबाब घेऊन मुंबईलाच्या दिशेनं रवाना झालं आहे. दरम्यान आता या प्रकरणात विनोद पाटील यांच्या अडचणी वाढण्याची शक्यात आहे. त्यांची पुन्हा एकदा इडीकडून चौकशी होणार आहे.

## मुंबईहून वाराणसी निघालेल्या विमानाची इमर्जन्सी लँडिंग

# ५ विमानतळांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी



विशेष म्हणजे दिल्लीत भ्याड हल्ला झाला आहे. दिल्लीत लाल किल्ला परिसरात आत्मघातकी हल्ला करण्यात आला आहे. यामध्ये अनेक नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. तर अनेक जण जखमी झाले आहेत. या भ्याड हल्ल्यानंतर आता आणखी धक्कादायक माहिती समोर आली आहे. देशातील पाच प्रमुख विमानतळांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

आताच्या घडीची मोठी बातमी समोर आली आहे. मुंबईहून वाराणसीच्या दिशेला निघालेलं विमान हवेत असताना ते विमान बॉम्बने उडवून देण्याची धमकी आली आहे. त्यामुळे या विमानाचं तातडीने इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं आहे. तातडीने सुरक्षा यंत्रणा कामाला लागले आहेत. तसेच देशातील ५ महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय विमानतळांना थेट बॉम्बने उडवून देण्याची धमकी आली आहे. यामुळे कडेकोट बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. या धमकीनंतर अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. आता या प्रकरणात काय अपडेट येते? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

मुंबईहून वाराणसीच्या दिशेला जाणाऱ्या एअर इंडिया एक्सप्रेस फ्लाईटला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे ही फ्लाईट हवेत असताना हा धमकीचा मेल आला. यानंतर लाल बहादूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमानतळावर तातडीने हाय अलर्ट जारी करण्यात आला. विशेष म्हणजे विमानाची तातडीने इमरजन्सी लँडिंग करावी लागली आणि सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आलं. यानंतर आता विमानात बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाची कारवाई सुरु आहे. अधिकाऱ्यांकडून आता धमकी प्रकरणात सखोल तपास केला जातोय. याबाबत लवकरच महत्त्वाची अपडेट समोर येईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

इंडिगोला दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास धमकीचा ई-मेल आला आहे. यामध्ये मुंबई, दिल्ली, चेन्नई, हैदराबाद, तिरुअनंतीपुरुम या विमानांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी आली आहे. त्यानंतर सुरक्षा यंत्रणांकडून अलर्ट जारी करण्यात आला आहे. हा ई-मेल नेमका कुणी पाठवला, याबाबतची सविस्तर माहिती लवकरच समोर येऊ शकते.

# कोल्हापुरात स्मशानभूमी आणि घरात बायकांना झोपवून चुटकी वाजवायचा

## मुली आणि महिलांवर तंत्रविधी, मानवी कवट्या आणि पुन्हा वशीकरण...

■कोल्हापूर। प्रतिनिधी,

अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीविरोधात पुरोगामी विचारांसाठी ओळखल्या जाणाऱ्या कोल्हापुरात पुन्हा एकदा अंधविश्वासाचे सावट गडद झाले आहे. कोल्हापूरच्या टिंबर मार्केट परिसरातील ‘चुटकीवाला बाबा’ नावाच्या तथाकथित बाबाचे व्हिडिओ सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल होऊ लागले लागले आहेत. त्यातील अघोरी प्रयोगांमुळे नागरिकांमध्ये संताप उसळला आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या बाबाविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केल्यानंतर पोलीस यंत्रणा देखील या बाबाचा ठावठिकाणा शोधून काढण्याच्या कामाला लागली आहे.

**करणी, वशीकरणाचे व्हिडीओ व्हायरल**

‘चुटकीवाला बाबा’चे सहा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले आहेत. एका व्हिडिओत तो जमिनीवर बसलेल्या व्यक्तीच्या कपाळावर हात ठेवून काही मंत्रोच्चार करताना दिसतो; दुसऱ्यात मानवी कवटीचा आधार घेत काही विधी करत असल्याची दृष्ये आहेत. तिसऱ्या आणि चौथ्या व्हिडिओत तो स्त्रिया आणि तरुणींवर चिमट्यासारख्या साधनाने स्पर्श करत अघोरी तंत्रविधी करतो आहे. एका दृश्यात त्रिशूल हातात घेऊन काही जप करताना दिसतो. तसेच या व्हिडिओंनी कोल्हापुरात आणि परिसरात खळबळ उडाली आहे.



दरम्यान, ‘चुटकीवाला बाबा’ प्रकरणाने कोल्हापुरातील भोंदूगिरी आणि अंधश्रद्धेच्या वाढत्या प्रवाहाची गंभीर झलक पुन्हा एकदा दाखवून दिली आहे. जनजागृती, कठोर कायदेशीर उपाय आणि सामाजिक सहभाग या तिन्ही साधनांतूनच अशा अंधश्रद्धेचा कायमस्वरूपी बंदोबस्त होऊ शकतो, हे या घटनेने अधोरेखित झाले आहे.

**कठोर कारवाईची अंनिसची मागणी**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या गीता हसुरकर यांनी सांगितले की, अशा भोंदू बाबांचा प्रभाव निरपराध मुलं, महिला आणि सामान्य नागरिकांवर पडतो. त्यांच्या मानसिक तसेच आर्थिक शोषणाचा हा प्रकार असून याविरोधात कडक कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. नागरिकांनी अशा भोंदूगिरीपासून दूर राहून संशयास्पद बाबी तात्काळ पोलिसांना किंवा समितीला कळवाव्यात, असे त्यांनी आवाहन केले आहे.

**पोलीस घेत आहेत बाबाचा शोध**

दरम्यान, जुना राजवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजीवकुमार झाडे यांनी सांगितले की, "या प्रकरणी अद्याप कोणतीही औपचारिक तक्रार आली नसली, तरी व्हिडिओंच्या आधारे चौकशी सुरू केली आहे. सध्या तो बाबा कोल्हापूरबाहेर असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून लवकरच त्याचा नवा ठावठिकाणा शोधला जाईल." तसेच "या बाबाने कुणाची जर आर्थिक किंवा अन्य फसवणूक केली असेल तर पुढे येऊन याबाबत नागरिकांनी पोलिसांना कळवावे," असे आवाहन देखील झाडे यांनी केले आहे.

**निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वाढती भोंदूगिरी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भोंदूगिरीच्या अशा घटना वाढत असल्याचे पाहायला मिळत आहे. उमेदवारांच्या नावावर करणी, लिंबू कापणे, खिळे मारणे अशा प्रथा समाजात भीतीचे वातावरण निर्माण करत आहेत. प्रशासन आणि समाजाने एकत्र येऊन या प्रकारांना आळा घालणे अत्यंत आवश्यक झाले आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# परतलेला दहशतवाद



राजधानी दिल्लीत भीषण बॉम्बस्फोट झाला आणि तोही अशा भागात जेव्हा दिवसाच्या प्रत्येक प्रहरी हा भाग गजबजलेला असतो. लालकिल्ल्याच्या ऐतिहासिक परिसरात भीषण बॉम्बस्फोट होऊन १४ जण ठार झाले, तर कित्येक जखमी झाले. या भागात पूर्वी दहशतवादी बॉम्बस्फोट घडवायचे. १४ वर्षांनंतर पुन्हा त्या भीषण आणि दहशतवादी दिवसांची आठवण ताजी झाली. गर्दीने गजबजलेला हा भाग आता मातम करण्यात बदलून गेलाय. दशकभराच्या कालावधीपासून सुखाने मार्गक्रमण करणाऱ्या लोकांच्या जीवनात या स्फोटाने उथलपुथल माजवली. लोक पुन्हा एकदा अशांत पर्व अनुभवत आहेत. या स्फोटाच्या अगोदर म्हणजे १० नोव्हेंबरला फरिदाबाद येथे एका काश्मिरी डॉक्टरला अटक करून त्याच्याकडून ३६० किलो स्फोटके जप्त करण्यात आली होती. या घटनेचा सदर बॉम्बस्फोटाशी संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे. पुलवामा येथे झालेल्या स्फोटाशी या स्फोटाच्या सूत्रधाराचा संबंध असावा असा संशय आहे. एनआयए म्हणजे राष्ट्रीय तपास संस्थेने हा तपास आता हाती घेतला आहे आणि त्यातून नक्की काय ते समोर येईल. दहशतवाद्यांविरोधात आवश्यक ती पावले उचलली जात आहेत आणि यूएपीए म्हणजे पूर्वीचा टाडा कायदा दिल्ली परिसरात लागू करण्यात आला आहे. याचा अर्थ उघड आहे, तो म्हणजे दहशतवाद्यांना भारताची आगेकूच सहन होत नाही. त्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा दहशतवादाचा मार्ग अवलंबला आहे. पण हा भारत मोदी यांचा आहे. त्यामुळे येथे जशाला तसेच उत्तर दिले जाते. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताने हे दाखवून दिले आहे. त्यामुळे आता पाकिस्तानने भारताला पुन्हा आपण दहशतवादी हल्ले करून जेरीस आणू शकतो हे विसरून जावे कारण आता निषेधाचे पत्रक काढून शांत बसणारे सरकार नाही. आज वेगवेगळ्या वर्तमानपत्रांत या हल्ल्यानंतर जी छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत त्यावरून हे लक्षात येते, की दहशतवाद्यांनी स्फोट घडवल्यावर सर्वत्र अफरातफरीचे आणि गोंधळाचे वातावरण होते. पण सर्वच घटनांनंतर असेच घडते. या स्फोटानंतर जी बातमी येत आहे ती जास्तच धोकादायक आहे, ती म्हणजे आयसी ८१४ च्या अपहरणांतर दहशतवाद्याची अदलाबदल झाली. त्यानंतर असलेली जैश-ई-अहमद ही संघटना या स्फोटामागे असावी का, याचा विचार सुरू आहे. लालकिल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटामागे तीन पुरुष आणि एक महिला होत्या. ज्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारतात घुसखोरी केली होती. या स्फोटामुळे भारताला चोख उत्तर द्यावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या भूतान दौऱ्यावर आहेत पण त्यांनी देशवासीयांना दिलासा दिला आहे, की दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर दिले जाईल. ऑपरेशन सिंदूरच्या वेळेस पंतप्रधानांचे उत्तर किती चोख असते आणि दहशतवाद्यांना कसे त्यांचे सरकार त्यांच्या आकांपर्यंत जाऊन त्यांना धडा शिकवतात हे देशाने मागेच पाहिले आहे. त्यामुळे मोदी जे बोलतात ते करून दाखवतात यावर जनतेचा विश्वास आहे. या स्फोटाची सूत्रधार मसूद अझरची बहीण शाहीन असल्याचे स्पष्ट झाले. तिचे एकच काम होते ते म्हणजे तरुणांना दहशतवादी कृत्ये करण्यास भाग पाडणे. दिल्ली धमाक्यांनंतर आता पाकिस्तानात घबराट पसरली आहे आणि हा दहशतवादी हल्ला होता. अर्थात हा सामान्य बॉम्बस्फोट नाही. सुरुवातीच्या तपासात ही बाब समोर आली आहे, की शाहीनने घाई गडबडीत लोकांना ठार मारण्याचा कट घडवण्यात आला. पाकिस्तान या हल्ल्यामुळे पॅनिक मोडमध्ये आहे आणि नरेंद्र मोदी स्फोटाला जबाबदार असलेल्यांना सोडणार नाहीत असे सांगत आहेत. मोदी म्हणाले, की या षड्यंत्राला जबाबदार असलेल्यांना सोडणार नाही आणि त्यांच्या या म्हणण्याला अर्थ आहे. पाकच्या मांडीवर बसून दहशतवादी कारवाया करणाऱ्यांना मोदी यांनी 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळेस चांगला धडा शिकवला होता पण तो पुरेसा नाही. यामुळे पाक परत त्याच दहशतवादाच्या मार्गाने गेला आहे. त्याचा खामियाजा त्याला भोगावा लागणार आहे. दिल्लीत लालकिल्ला परिसरात झालेल्या बॉम्बस्फोटात पोलिसांना दहशतवादाचा संशय आहे. त्यामुळे अपराध्यांना कडक शासन होऊन जे निरपराध नागरिक यात बळी पडले आहेत त्यांना न्याय मिळण्याची व्यवस्था सरकारने करायला हवी. मोदीही त्याच मानसिकतेतून जात आहेत. त्यामुळे स्फोटाच्या सूत्रधारांना धडा शिकवला जाणार हे स्पष्ट आहे. या स्फोट प्रकरणी तारिक अहमद मलिक हा आणखी एक संशयित आहे आणि त्याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. याच हल्ल्यानंतर हाफीझ सईदचा एक व्हिडीओ समोर आला आहे, त्यात त्याने भारतावर हल्ले करण्याची धमकी दिली आहे. देशभरात आता सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली असून विविध गुप्तचर संस्था आणि राष्ट्रीय तपास यंत्रणा या सर्व कामाला लागल्या आहेत. पाकिस्तान स्थित लष्कर-ए-तय्यबा भारतावर मोठ्या प्रमाणात हल्ले करण्याचा कट आखत आहेत अशी ती बातमी निश्चितच भारतीयांची झोप उडवणारी आहे. कारण भारताची आर्थिक, क्रीडा आणि विज्ञान क्षेत्रातील भरारी पाकची झोप उडवणारी आहे. भारताच्या मुलींनी विश्वचषक जिंकला आणि भारताचा पुरुष संघ तर कधीचाच पुढे आहे. त्यातच भारताने चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असा लौकिक मिळवला आहे आणि भारताने इस्रोच्या मदतीने अंतराळ संशोधन क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. त्यामुळे पाक अस्वस्थ होणे साहजिक आहे. पण आता काँग्रेसचे लेचेपेचे सरकार नाही. मनमोहन सिंग एकदा म्हणाले होते, की या देशातील साधनसामग्रीवर पहिला हक्क अंल्पसंख्याकांचा आहे. पण मनमोहन सत्तेतून गेले आणि पाक तसेच दहशतवाद्यांचे लाडही थांबले. आता येथे अल्पसंख्याकांना जशास तसे वागून त्यांना चोख धडा शिकवणारे सरकार आहे, पहलगाम हल्ल्याच्या वेळेसच मोदी यांनी याची चुणूक दाखवली होती. पाक हल्ल्याची जबाबदारी सरळ नाकारेल आणि दहशतवादी आमचे नाहीत असे सांगेल; परंतु पाकच्या कांगाव्याला भारत आता सावरला आहे आणि पाकच्या तंगड्या त्याच्याच गळ्यात कशा अडकावच्या ते भारताला चांगले माहीत आहे, कारण हा मोदी यांचा भारत आहे.

# रेल्वेचा आलबेल कारभार

**मुंबईची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी रेल्वे वेगळ्याच कारणांनी चर्चेत येऊ लागली आहे. गर्दीमुळे लोकलमधून पडून होणारे मृत्यू तसे नित्याचे झाले आहेत. यावर उपाय म्हणून स्वयंचलित दरवाजाची लोकल सेवेत आणण्याची तयारी रेल्वे मंत्रालयाने सुरू केली आहे.**



नोकरी-व्यवसायानिमित्त लाखो प्रवासी दररोज लोकल प्रवास करतात. या प्रवाशांचा प्रवास सुखकर करण्यासाठी रेल्वे प्रशासन विविध प्रकल्प राबवत असते. मात्र वेगाने होणाऱ्या नागरीकरणाच्या तुलनेत हे प्रकल्प अपुरे ठरत आहेत. सकाळी-सायंकाळी गर्दीच्या वेळी तर लोकलच्या डब्यात पाय ठेवण्यास जागा नसते. यातून होणारे वाद मुंबईकरांच्या अंगवळणी पडले आहेत. लोकलच्या डब्यात पाय ठेवण्यास जागा नसल्याने अनेक प्रवासी लोकलच्या दोन डब्यांमधील जागेत, टपावर तर कुणी दरवाजाला लटकून प्रवास करतात आणि यातूनच लोकलमधून पडून प्रवाशांना जीव गमवावा लागतो. दररोज किमान एक किंवा दोन प्रवाशांचा लोकल अपघातात मृत्यू होत आहे. मध्य रेल्वेची उपनगरीय रेल्वे सेवा ही छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कर्जत-खोपोली व कसारा या मुख्य मार्गावर, तर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेल/वांद्रे हार्बर मार्गावर, ठाणे ते पनवेल/वाशी ट्रान्स हार्बर मार्गावर तसेच नेरूळ/बेलापूर ते उरण पोर्ट मार्गावर अशी ३२५ किलोमीटर लांबीची आहे. मध्य रेल्वे या मार्गावर १८१० उपनगरीय लोकल चालवते. तसेच मुख्य मार्गावरून दररोज २१० पेक्षा अधिक मेल- एक्स्प्रेसही चालवते. सुमारे २४ तास चालणाऱ्या या सेवेत दररोज ४० लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करतात. पश्चिम रेल्वे मार्गावर चर्चगेट ते डहाणूपर्यंत दररोज सुमारे १४०६ लोकल चालविण्यात येत आहेत. या लोकलमधून ३० लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करत आहेत. लोकल गाड्यांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी प्रवास करत आहेत. मुंबई महानगर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असताना मात्र त्या तुलनेत पायाभूत सुविधा निर्माण झाल्या नाहीत. लांबचा प्रवास करण्यासाठी आजही नागरिकांना रेल्वे मार्गावरच अवलंबून राहावे लागत आहे. रेल्वेवर पडणारा ताण कमी करण्यासाठी मेट्रोचा पर्याय आला आहे. मात्र रेल्वेला समांतर यंत्रणा निर्माण न झाल्याने लोकलवरील प्रवाशांचा ताण कमी झालेला नाही. त्यामुळे प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. लाखो प्रवाशांना सेवा देताना रेल्वे प्रशासनावर ताण येत आहे. मात्र कामात कसूर केल्यास अनेकांचे जीव जाऊ शकतात. हे मुंब्रा दुर्घटनेने दाखवून दिले आहे. मोटरमन, अभियंते आणि अन्य वरिष्ठ अधिकारी रेल्वे सेवा सुरळीत चालण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतात. यामुळे तर उपनगरीय लोकल अनेक आव्हाने पेलत सुरळीत सेवा देत आहे. परंतु एखाद-दुसरी घटना रेल्वेच्या बदनामीस कारणीभूत ठरते. अशा प्रसंगी वरिष्ठांनी प्रवाशांच्या जीवाशी खेळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. जून महिन्यात मुंब्रा येथे झालेल्या दुर्घटनेत पाच प्रवाशांचा मृत्यू, तर नऊ प्रवासी जखमी झाले. या घटनेबाबत वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्थेने (व्हीजेटीआय) दिलेल्या अहवालामध्ये आणि तपास अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासात रेल्वे अधिकाऱ्यांनी रेल्वे रुळांच्या देखभालीचे काम न केल्याने हा अपघात घडल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. यानुसार मध्य रेल्वेचे वरिष्ठ विभागीय अभियंता समर यादव आणि सहाय्यक विभागीय अभियंता विशाल डोळस यांच्याविरोधात ठाणे रेल्वे पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला. हे गुन्हे मागे घेण्यासाठी सेंट्रल रेल्वे मजदूर संघाने गेल्या आठवड्यातील गुरुवारी घेतलेल्या आडमुठ्या भूमिकेने लाखो प्रवाशांना वेठीस धरले. लोकल ठप्प झाल्याने प्रवाशांनी चालत पयार्यी मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र याचदरम्यान लोकल सुरू झाली, याची कोणतीही माहिती रुळावरून चालणाऱ्या प्रवाशांना नसल्याने मशीद बंदर-सँडहर्स्ट रोड स्थानकांदरम्यान त्यांना लोकलने धडक दिली. यामध्ये दोन प्रवाशांचा मृत्यू झाला. मुंब्रा घटनेमध्ये मृत्यू झालेल्या प्रवाशांचे कुटुंबीय न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. या घटनेला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई होत असताना रेल्वे संघटना दोषी अधिकाऱ्यांच्या बचावासाठी मैदानात उतरते. लाखो प्रवाशांना वेठीस धरून दोन जीवांचे बळी जाण्यास कारणीभूत ठरते. रेल्वे रुळामधून चालणे गुन्हा असला तरी तब्बल एक तास लोकल ठप्प करणारेही गुन्हेगार ठरवले गेले पाहिजेत. संघटनेने ६ नोव्हेंबर रोजी सीएसएमटी येथील डीआरएम कार्यालयासमोर मोर्चा काढण्याचे पत्र रेल्वे प्रशासनाला दिले होते. त्याप्रमाणे हा मोर्चा फलाट क्रमांक ७ आणि ८ पासून सुरू होऊन त्याचे रूपांतर एका मोठ्या बैठकीत होईल, असा उल्लेख पत्रात करण्यात आला. मात्र संघटनेने हा मोर्चा मोटरमन, लोकल व्यवस्थापकाच्या दालनाबाहेर काढला. मोटरमन, लोकल व्यवस्थापकांना आंदोलकांनी बाहेर येऊ न दिल्याने लोकल सेवा ठप्प झाली. या आंदोलकांना दूर करून लोकल सेवा सुरळीत करण्यात प्रशासनाला अपयश आले. लाखो प्रवाशांना वेठीस धरल्याप्रकरणी आणि दोन मृत्यूस आजवर कोणासही जबाबदार ठरविण्यात आलेले नाही. याउलट मुंब्रा घटनेतील दोषींना वाचविण्यासाठी संघटना मैदानात उतरल्या आहेत. मात्र प्रवासी वाऱ्यावर आहेत. रेल्वे मार्गावर कोणताही तांत्रिक बिघाड होताच लोकल सेवा अधिकाधिक अर्ध्या तासात पूर्ववत केली जाते. मात्र संघटना आणि रेल्वे कर्मचारी तब्बल एक तास लोकल सेवा विस्कळीत करून प्रवाशांची गैरसोय करतात. याबाबत केंद्रीय रेल्वे मंत्री आणि राज्य सरकारने दखल घेतलेली दिसत नाही. यातच जबाबदार अधिकाऱ्यांना संघटना पाठीशी घालू लागल्या, तर प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे.

# चुकांचा चक्रव्यूह

आश्रमात रात्री आलेला पाहुणा गुरुदेव ंच्या दर्शनासाठी उत्सुक होता. गुरुदेव आले. आसनस्थ झाले. गुरुदेवांनी पाहुण्याकडे पाहून मंद स्मित केलं. गुरुदेवांना वंदन करून पाहुणा बोलू लागला, 'मी अत्यंत अस्वस्थ आहे. हल्ली माझी अस्वस्थता, बेचैनी आणि मानसिक तगमग वाढतेच आहे. हे चुकीचे आहे, हे मला समजतं. यातून बाहेर पडण्याचा जितका प्रयत्न करतो तितकी अस्वस्थता वाढते.' एवढं सगळं एका दमात बोलल्यावर पाहुणा क्षणभर थांबला. खाली मान घालून गुरुदेवांच्या चरणांकडे पाहत तो पुढे म्हणाला, 'मी आयुष्यात खूप मोठ्या चुका केल्या. काही चुकांमुळे मला चांगलेच फटके बसले. पण कालांतराने मी त्यातून बाहेर पडलो. सावरलो. पण आज त्या चुका आठवून खूप त्रास होतो. आपण तेव्हा असे नकारात्मक का वागलो, याचं कोडंच सुटत नाही. गतकाळातील चुकांचा पाढा सतत डोक्यात वाजत राहिल्याने मी माझा आत्मविश्वास गमावतो की काय, असं मला वाटू लागलं आहे. गुरुदेव, मला या चुकांच्या चक्रव्युहातून, नकारात्मक वागण्याच्या वेढ्यातून सुटायचं आहे.' गुरुदेवांनी विचारलं, 'चूक म्हणजे काय? नकारात्मक वागणं म्हणजे काय?'पाहुणा म्हणाला, 'आता माझ्या किती चुका सांगू? आणि काय-काय सांगू?' मंद स्मित करत गुरुदेव म्हणाले, 'फक्त सकारात्मक वागणं किंवा फक्त नकारात्मक वागणं असं काही नसतं. हे सापेक्ष असतं. एखादी घटना किंवा त्यावेळचं तुमचं वागणं याकडे तुम्ही कसं पाहता, यावर ते सकारात्मक की नकारात्मक, हे ठरतं. माझ्यासाठी जे सकारात्मक आहे तेच दुसऱ्यासाठी नकारात्मक असू शकतं. यातला फरक ओळखण्याचा सोपा मार्ग म्हणजे मनाची तटस्थता.'

# जखमेवर मीठ चोळणारे सरकार!

**शेतकरी अतिवृष्टीमुळे आजही हालअपेष्टा भोगत आहे. सरकार नावाच्या यंत्रणेने अतिवृष्टीनंतर त्याला तातडीने मदत देणे तर सोडाच, उलट त्याच्या नुकसानाची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक रात्री टॉर्च घेऊन पाठवून शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळण्याचे काम केले आहे.**



मराठवाडा पुन्हा एकदा निसर्गाच्या कोपाचा बळी ठरला आहे. अतिवृष्टी, सलग पावसाची झड आणि अनियमित हवामानामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. विशेषतः संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, नांदेड, लातूर, उस्मानाबाद आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये परिस्थिती अतिशय गंभीर आहे. या अतिवृष्टीमुळे सर्वाधिक फटका सोयाबीन, कापूस, तूर आणि मका या पिकांना बसला आहे. सोयाबीन पूर्णपणे ओलसर झाल्यामुळे दाण्यांची गुणवत्ता घटली आहे. कापूस झाडांवरच कुजत असून शेतकरी ‌‌पीक काढायचं की नाही‌ या द्विधा मनस्थितीत आहेत. तूर आणि हरभरा या पिकांचे बियाणे लावलेले क्षेत्र पाण्याखाली गेल्याने पुढील हंगामही धोक्यात आला आहे. काही भागांत तर ऊस आणि भाज्यांचे उत्पादन पूर्णपणे नष्ट झाले आहे. फक्त शेतीच नव्हे, तर ग्रामीण भागातील रस्ते, पूल आणि विजेच्या तारा देखील पावसाने उद्ध्वस्त केल्या. अनेक गावांमध्ये अजूनही वाहतूक खंडित आहे. शेतकऱ्यांची जनावरे वाहून गेली, गोठ्यांतील चारा संपला आणि आर्थिक फटका अनेक पटींनी वाढला आहे. प्राथमिक अंदाजानुसार मराठवाड्यातील ५ ते ७ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे कृषी विभागाचे संकेत आहेत. मात्र प्रत्यक्ष आकडा यापेक्षा अधिक असण्याची शक्यता आहे, कारण अनेक शेतकरी अजून पंचनाम्याच्या प्रतीक्षेत आहेत. शेतकऱ्यांनी सरकारकडून माफक अपेक्षा ठेवल्या होत्या, मात्र त्या देखील हे सरकार पूर्ण करताना दिसत नाही. तातडीने पंचनामे पूर्ण करणे आणि मदत वितरण करणे, पीकविमा कंपनीकडून तत्काळ भरपाई देणे, शेतकऱ्यांचे वीजबिल आणि कर्जहप्ते स्थगित करणे, चाऱ्याची, बियाण्यांची मदत योजना जाहीर करणे, नुकसानग्रस्त क्षेत्रांना विशेष पॅकेज जाहीर करणे या सामान्य शेतकऱ्यांच्या मागण्या होत्या, मात्र सरकार आपला अहवाल तयार करत बसली आणि शेतकरी सरकारी मदतीची वाट पाहत बसला.

### सर्वेक्षण आणि केंद्राच्या पथकाचा दिखावा

राज्य शासनाने प्राथमिक सर्वेक्षण सुरू केलं असलं, तरी शेतकरी वर्ग नाराज आहे. त्यांचं म्हणणं आहे की, ‌सर्वेक्षण होतं, पण मदत मात्र कागदावरच राहते.‌ मागील वर्षीच्या अतिवृष्टीसाठीही अनेक शेतकऱ्यांना अजूनपर्यंत पूर्ण नुकसानभरपाई मिळालेली नाही. मराठवाड्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या प्रचंड नुकसानीनंतर केंद्र सरकारकडून पाठवलेल्या केंद्रीय पथकाने रात्री उशिरापर्यंत सर्वेक्षण करून परिस्थितीचा आढावा घेतला. परंतु या पाहणीला शेतकऱ्यांनी "फक्त दिखाऊ दौरा" असे संबोधत नाराजी व्यक्त केली आहे. केंद्रीय पथकाने संभाजीनगर, जालना, बीड आणि परभणी जिल्ह्यातील काही अतिवृष्टीग्रस्त गावांना भेट दिली. पथकात कृषी, आपत्ती व्यवस्थापन आणि गृह मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी होते. त्यांनी शेतांमधील पाणथळ क्षेत्रे, उद्ध्वस्त झालेली पिके, घरांचे आणि रस्त्यांचे नुकसान पाहून फोटो आणि व्हिडीओद्वारे पुरावे संकलित केले. मात्र हा पाहणीचा फार्स रात्रीच झाल्याने अनेक शेतकरी उपस्थित राहू शकले नाहीत. परिणामी, खरे नुकसान आणि परिस्थितीची तीव्रता पथकाच्या लक्षात आली का, हा प्रश्न उभा राहतो. शेतकऱ्यांनी या पाहणी दौऱ्यावर नाराजी व्यक्त केली. रात्री अंधारात कॅमेऱ्यांनी पिकांचं नुकसान कसं दिसणार? दिवसा आल्यास परिस्थिती किती बिकट आहे हे लक्षात आलं असतं. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी अर्धवट पंचनामे आणि अपुऱ्या मदतीविरोधात घोषणाबाजी केली. काही गावांत तर पथकाचा ताफा अडवून शेतकऱ्यांनी थेट नुकसान दाखवण्याचा प्रयत्न केला. स्थानिक प्रशासनाने सांगितले की, पथकाने रात्रभर दौरा करण्याचा निर्णय हवामानातील बदल आणि वेळेअभावी घेतला, कारण दिवसाच्या वेळेत रस्ते वाहतुकीस अडथळे होते. अधिकाऱ्यांनी सांगितले की, "दिवसाचं सर्वेक्षण पुढील टप्प्यात होईल; सध्याचा दौरा प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी होता." केंद्रीय पथकाच्या अहवालावरून केंद्र सरकारकडून विशेष आर्थिक मदतीचे पॅकेज जाहीर होण्याची अपेक्षा आहे. राज्य सरकारने आधीच प्राथमिक आकडे सादर केले आहेत. अंदाजे ५,००० कोटी रुपयांहून अधिक नुकसान झाल्याचे नमूद केले आहे. रात्रीच्या या सर्वेक्षणाने प्रशासनाने आपली जबाबदारी पूर्ण केली असे भासते, पण शेतकऱ्यांच्या नजरेत ते नुसतेच फोटो-ऑफ ठरले. मराठवाड्याच्या शेतकऱ्यांना आता दिवसाच्या उजेडात मदत आणि भरपाईची खात्री हवी आहे. कारण प्रत्येक पिकाच्या मागे त्यांचा घामच नाही, तर आयुष्याची पुंजी आहे.

### उद्धव ठाकरे यांनी धीर दिला

संभाजीनगर, धाराशिव, बीड, जालना या जिल्ह्यामध्ये फिरताना उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून घेतल्या आणि त्यांना धीर दिला. संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील नांदर येथे उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना सांगितले की, "शेतकरी भोळाभाबडा आहे. इतिहासात कधी नव्हे एवढी आपत्ती मराठवाड्यावर आली. हेक्टरी ५० हजार भाव मिळालाच पाहिजे, अशी आमची मागणी आहे. राज्य सरकार फक्त अभ्यास करत आहे. मी कसलीही मागणी नसताना कर्जमुक्ती केली. राज्य सरकारकडे कर्जमुक्तीसाठी संपूर्ण यंत्रणा आहे. परदेशी समिती स्वदेशी शेतकऱ्यांची वाट लावणार आहे. पॅकेज ही थट्टा आहे. नुकसानभरपाई अजून कोणालाच मिळाली नाही. पीकविमा २ किंवा ३ रुपये देऊन शेतकऱ्यांची थट्टा सुरू आहे. एका शेतकऱ्याला ८९ रुपये मिळाले. आता कर्जमुक्ती केली तर बँकांना फायदा होईल असे म्हणतात, तर जूनमध्ये बँकांना फायदा होणार नाही याची माहिती द्यावी. न्याय मिळेपर्यंत शेतकऱ्यांच्या पाठीशी राहणार. दिवाळी अगोदर नुकसानभरपाई देऊ असे म्हणाले. मदतीच्या नावाने आळस करतात.

शेतकरी हताश झाला आहे. आता त्याला मदत केली नाही तर तो शेतकरी संकटात जाईल. खोटे बोलणारे सरकार असून याच्या विरोधात आम्ही उभे राहणारे आहोत. शेतकरी म्हणून एकत्र आलो तरच न्याय मिळणार आहे. शेतकरी जमिनीतून कोंब फोडू शकतो, तर राज्य सरकारला नक्कीच फोडणार आहे. शेतकरी संकटात असताना मुख्यमंत्री बिहारमध्ये प्रचार करत आहे. कर्जमुक्ती झालीच पाहिजे. ५० हजार हेक्टरी मिळेपर्यंत सोबत असणार आहे.

### गावांमध्ये संवाद

धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यात संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनी सरकारला थेट गावात येऊन चर्चा करण्यासाठी आव्हान दिले. "मराठवाड्यात पाणी पडत नाही. आता अतिवृष्टीच्या नुकसानीपोटी नाले फुटले आहेत. पाणी साठवता येत नाही. घर सोडून पळून जाणारे मुख्यमंत्री आहेत. शेतकरी राज्याचा बाप आहे. जगातले सर्वात मोठे पॅकेज कोणत्या खेकड्याने खाल्ले आहे. पीकविमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचा हक्काचा पैसा घेऊ नका. शेतकऱ्यांना फुकट नकोय, हक्काचे पैसे द्या. माझे सरकार असताना शेतकऱ्यांना हमीभाव दिला होता. शेतकऱ्यांना कर्ज फेडता येत नसल्याने कर्जमुक्ती हवी आहे. राज्य सरकार सत्तेच्या मस्तीत आहे. मतचोरी मोठा घोटाळा आहे. दरोडा घालणारे हे दगाबाज सरकार आहे. निवडणूक आयोगाचा मालक भाजप आहे. शेतकरी मेला तरी चालेल, असे धोरण राज्य सरकारचे आहे. दिवाळी गोड करणार होते. दिवाळी झाली तरीही हे सण गोड करू शकले नाहीत. कर्जमुक्ती करून मी कोणावर उपकार केले नाही. पहिल्याच अधिवेशनात मी कर्जमुक्ती केली होती. शासकीय यंत्रणाच मी हाताशी घेतली होती. महात्मा जोतिबा फुले शेतकरी सन्मान योजनेचा दुसरा टप्पा या सरकारने घोषित करून दाखवावा. हे पाकीटमार सरकार आहे. म्हणून शेतकऱ्यांना एकत्र येणे आवश्यक आहे. महायुतीला मत देणार नाही जोपर्यंत कर्जमुक्ती होणार नाही. हेच कर्जमाफीचे औषध आहे. जनावरे वाहून गेली. त्याची भरपाई मिळाली नाही. बिहारमध्ये कोणतीही समिती गठित न करता दहा हजार रुपये दिले आहेत. तसेच महाराष्ट्रात शेतकरी कर्जमुक्तीसाठी राज्य सरकारने केली पाहिजे," अशी मागणी त्यांनी केली.

### शेतकऱ्याला सतावतोय एकच प्रश्न जगायचे कसे?

शेतकरी अस्मानी संकटाशी जोमाने लढला. आता सुलतानी संकटाशी लढणे आहे. जगायचे कसे असा प्रश्न असताना मुख्यमंत्री विकासाच्या गप्पा मारत आहेत. विरोधी पक्ष आता येणाऱ्या अधिवेशनात विधिमंडळात शेतकऱ्यांचा प्रश्न घेऊन जाणार आहे. संकट स्वदेशी असताना परदेशी समिती कशाला. उत्पादनापेक्षा खर्च अधिक वाढला आहे. शेतकऱ्यांना राज्य सरकार सल्ला देत आहे. सल्ला नको-कर्जमुक्ती करा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

निवडणुका जिंकण्यासाठी राज्य सरकार म्हणावे ते करत आहे. शेतकरी सोबत असल्याने विरोधक ही लढाई लढत आहेत. शेतकऱ्यांच्या नावाने राज्य सरकार लूट करत आहे. शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहे. विरोधकांनी आता एकच निश्चय केला आहे. काहीही झाले तरीही शेतकऱ्यांची साथ सोडणार नाही. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती जोपर्यंत होत नाही तोपर्यंत महायुतीला मत नाही. त्यामुळे महायुतीचे नेते आता येणाऱ्या निवडणुकासाठी मतं मागायला आले की त्यांना कर्जमुक्तीचे काय झाले? असा सवाल विचारून, शेतकरी एकच प्रश्न विचारणार आहे 'सांगा सरकार आम्ही जगायचे कसे?'

# चटकदार रीव्हर्स वडापाव



**साहित्य :** ४ व्हाइट ब्रेड स्लाइस, बेसन, हिरवी चटणी, लाल सुकी चटणी, ६ पाकळ्या बारीक चिरलेला लसूण, आल्याचा तुकडा ठेचलेला, कढीपत्ता, १ कांदा बारीक चिरलेला, बेकिंग सोडा, हिंग, जिरे, मोहरी, हिरवी मिरची बारीक चिरलेली, मीठ, ४ उकडून कुस्करलेले बटाटे, कोथिंबीर बारीक चिरलेली, तेल.

**भाजीची कृती :** प्रथम पॅनमध्ये १ टेबलस्पून तेल गरम करायला ठेवा. तेल तापले की, त्यात जिरे, मोहरी, कढीपत्ता, हिंग, लसूण, आले, हिरवी मिरची, कांदा व हळद घालून नीट ढवळून एक करा. कांदा लालसर झाला की त्यात कुस्करलेला बटाटा घाला व मिश्रण नीट परतवत राहा. नंतर आवश्यक तेवढे मीठ घाला आणि झाकण ठेवून एक वाफ काढा. मग कोथिंबीर घाला व गॅस बंद करा.

**बेसनाचा घोळ :** एका बाऊलमध्ये बेसन घ्या. त्यात १/२ टीस्पून प्रत्येकी बेकिंग सोडा, हळद व मीठ घाला. आवश्यकतेनुसार पाणी घालून बेसनाचा घोळ तयार ठेवा.

**सँडविच कृती :** ब्रेड स्लाइसच्या कडा कापून घ्या व चार चौकोनी तुकडे करा. एका तुकड्यावर हिरवी चटणी लावा व त्यावर लाल चटणी टाका. दुसरा ब्रेडचा तुकडा त्यावर ठेवा. अशाप्रकारे सर्व सँडविच करून घ्या. आता पॅन गॅसवर गरम करायला ठेवा व त्यात थोडे तेल घालून पसरवा. तेल तापल्यावर तयार छोटे सँडविच दोन्ही बाजूनी भाजून घ्या.

**कृती :** वरील तयार भाजीचे गोळे करून तयार ठेवा. एक गोळा घेऊन हातावर त्याची पाती करा व पातीवर वरील सँडविच ठेवा. वरून दुसरी पाती ठेवा व सँडविच बटाट्यानी नीट बंद करून हलक्या हाताने दाबा. अशाप्रकारे सर्व सँडविचचे वडे तयार करून घ्या. कढईत तळण्यासाठी मध्यम आचेवर तेल तापायला ठेवा. आता प्रत्येक वडा बेसनाच्या घोळात बुडवून तेलात तळून घ्या व मधून कापून चटणी किंवा सॉसबरोबर गरम गरम सर्व्ह करा.

# केसांना तेल लावताना घ्या 'ही' काळजी

**केसांचं आरोग्य जर निरोगी राखायचं असेल तर त्यांची नीट काळजी घेणं गरजेचं आहे. लांबसडक, काळेभोर केस असावेत अशी प्रत्येक तरुणीची इच्छा असते. मात्र असे केस मिळवण्यासाठी केसांना दररोज तेल लावणं गरजेचं आहे. केसांना दररोज तेल लावल्यामुळे केसांची मुळं मजबूत होतात. त्यासोबतच डोक्यावरील त्वचेसाठीही तेल तितकंच गरजेचं असतं. तेलामुळे डोक्यावरील त्वचेला पोषण मिळतं. तसंच रक्तपुरवठाही सुरळीत होतो.**



**केसांसाठी**

नारळाचं तेल, बदामाचं तेल किंवा मोहरीचं तेल विशेष गुणकारी असतं. या तेलाचा वापर केल्यामुळे केस काळेभोर आणि घनदाट होण्यास मदत होते. मात्र तेलाचा वापर करताना काही गोष्टींकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. चला तर मग जाणून घेऊयात तेल लावताना कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात याविषयी -

**डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे**

तेल लावताना डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे विशेष गरजेचं आहे. त्यासोबतच केसांच्या मुळाकडेही तितकंच लक्ष द्यावं लागतं. केसांची मूळ मजबूत असतील तर केसांची वाढ लवकर होते. त्यासोबतच केसांची गळतीदेखील होत नाही. डोक्यावर नारळाच्या तेलाने मसाज केल्यास याचा परिणाम लवकर दिसून येतो.

**रोज केसांना मसाज करावा**

केसांच्या आरोग्यासाठी केसांना केवळ तेल लावणं हा उपाय नाही तर तेल लावण्यासोबतच केसांच्या मुळांना मसाज करणेदेखील गरजेचं आहे. मसाज करण्यासाठी शक्यतो कोमट तेलाचा वापर करावा. कोमट तेलाने मसाज केल्यामुळे केसांची मुळं बळकट होतात.



**तेल लावणं कधीही विसरू नका**

केसांना तेल लावल्यामुळे अनेक वेळा केसांमध्ये चिकटपणा निर्माण होतो, अशी तक्रार महिला वर्गातून येत असते. त्यामुळे अनेक वेळा तरुणी केसांना तेल लावण्याचं टाळतात. मात्र केसांना तेल न लावण्याची चूक कधीही करू नका. केसांच्या वाढीसाठी तेल लावणं महत्त्वाचं आहे. घराच्या बाहेर पडल्यानंतर केसांना धूळ, माती, प्रदूषण या साऱ्या घटकांचा सामना करावा लागतो. त्यामुळे केस कोरडे होतात. परिणामी केसांचं गळण्याचं आणि केस तुटण्याचं प्रमाण वाढतं. या साऱ्या समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी केसांना तेल लावणं गरजेचं आहे.

**तेल किंवा शाम्पूचा अतिरेकही करू नये**

कोणतीही गोष्ट प्रमाणापेक्षा जास्त झाली तर त्याचे दुष्परिणामही सहन करावे लागतात. त्यामुळे तेल असो किंवा शाम्पू दोघांचाही वापर प्रमाणात असावा. जर डोक्यावर तेलाचा जास्त मारा झाला तर डोक्यावरील भार वाढतो आणि केसदेखील तेलकट दिसून लागतात.

# फूड पॉइजनिंगपासून बचावासाठी ४ प्रभावी उपाय

**बाहेरचा आहार घेणे अनेकदा त्रासदायक ठरतं. खाद्यपदार्थ लवकर खराब होतात आणि यामुळेच फूड पॉइजनिंगचा त्रास उद्‌भवतो. अशाच काही टिप्स लक्षात ठेवल्या तर यापासून वाचता येऊ शकतं.**

- **लिंबाचे सेवन**

लिंबात अँटी-इंफ्लेमेटरी, अँटीबेक्टेरियल आणि अँटीव्हायरल गुण आढळतात. म्हणून लिंबू पाणी पिण्याने बॅक्टेरिया मरतात. आपण रिकाम्यापोटी लिंबू पाणी पिऊ शकता. शक्य असल्यास गरम पाण्यात लिंबू पिळून पिऊ शकतात. परंतु पाणी स्वच्छ असावे याची काळजी घेणे अती आवश्यक आहे.

- **तुळशीचे सेवन**

तुळशीत आढळणारे अँटीमिकोबियल गुणधर्म सूक्ष्मजीवांच्या सामोरे जातात. तुळस अनेक प्रकारे आहारात सामील करता येईल. दह्यात तुळशीचे पान, काळीमिरी आणि मीठ घालून सेवन करू शकता किंवा चहात तुळशीचे पान टाकून सेवन करू शकता.

- **दह्याचे सेवन**

दही एका प्रकारे अँटीबायोटिक आहे आणि यात जरा काळं मीठ घालून खाल्ल्याने आराम मिळेल.

- **लसणाचे सेवन**

लसणात अँटी फंगल गुण असल्यामुळे सकाळी रिकाम्या पोटी लसणाच्या १-२ पाकळ्या पाण्यासह घेतल्याने आराम मिळेल.



# बहुगुणकारी ताडगोळे

**ताडगोळे हे फळ वर्षामध्ये ठरावीक ऋतूमध्ये, म्हणजे उन्हाळ्यामध्ये उपलब्ध असणारे फळ आहे. याची चव काहीशी शहाळ्यातील मलई प्रमाणे लागत असून, चवीला हे फळ मधुर असते. इंग्रजी भाषेमध्ये 'आईस ॲपल' या नावाने ओळखले जाणारे हे फळ आरोग्याच्या दृष्टीने देखील अतिशय गुणकारी असल्याचे म्हटले जाते. या फळाला मुंजाल या नावानेही काही प्रांतांमध्ये ओळखले जाते. या फळाचे आरोग्यासाठी असणारे फायदे जाणून घेऊ या...**



**ज्यांना** वजन घटवायचे असेल, त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे आणि यामध्ये असलेल्या रसामुळे भूक शमण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार काही ना काही खाण्याची इच्छा होत नाही. ज्यांना लिव्हरशी निगडित काही समस्या असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उपयुक्त आहे.

या फळामध्ये पोटॅशियम मुबलक मात्रेमध्ये असून त्यामुळे लिव्हरमध्ये साठलेले घातक, विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते. या फळाच्या सेवनामुळे शरीराला श्रम करण्यासाठी आवश्यक ताकद आणि ऊर्जा मिळत असते. या फळाच्या सेवनामुळे शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्यामुळे दिवसभराच्या कामासाठी लागणारी ताकद या फळाच्या सेवनाने मिळत असते.

या फळाच्या सेवनाने शरीराला आवश्यक असलेले क्षार आणि इतर पोषक तत्त्वे संतुलित मात्रेमध्ये मिळत असतात. ज्यांना त्वचेवर उन्हाळ्यामुळे सतत पुरळ येत असेल किंवा ज्यांना या दिवसांमध्ये चेहऱ्यावर सतत मुरुमे येत असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळामध्ये कर्करोगप्रतिरोधी तत्त्वे असून, विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले गेले आहे. या फळामध्ये अँथोसायनिन नामक फायटोकेमिकल स्तनाच्या कर्करोगापासून बचाव करणारे आहे. आरोग्यासाठी या फळाचे फायदे पुरेपूर मिळवण्यासाठी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये या फळाचे भरपूर सेवन करावे.

# कोणतेही ॲप डाऊनलोड करताना राहा सावध!

## 'या' ४ गोष्टींकडे द्या विशेष लक्ष, नुकसान होणार नाही

**युजर्स** गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहिती आहे का? गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे कधी-कधी धोकादायक ठरू शकते. कसे ते जाणून घ्या. आजकाल प्रत्येकाकडे स्मार्टफोन असतो आणि त्यामध्ये अनेक ॲप्स असतात. या ॲप्समुळे रोजची अनेक महत्त्वाची कामे कुठल्याही अडचणींशिवाय पार पडतात. अनेक जण गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहीत आहे का की, काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. तुम्ही अँड्रॉइड युजर असाल तर ही विशेष माहिती नक्कीच तुमच्या कामी येईल. पाहा डिटेल्स.



**हे असू शकते धोकादायक**

काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. कारण, गुगल प्ले स्टोअर मालवेअर आणि हॅकर्ससाठी ॲप्स फारसे स्कॅन करत नाही. अशा परिस्थितीत गुगलच्या स्टोअरवर मालवेअर प्रभावित ॲप्स असण्याची शक्यता आहे. तुम्ही हे ॲप डाऊनलोड केल्यास ते तुमचा वैयक्तिक डेटा चोरू शकतात. हे तुमची आर्थिक ओळखपत्रे देखील चोरू शकतात.

**असे सुरक्षित रहा**

तुम्ही डाऊनलोड करत असलेले ॲप तुम्हाला कोणत्या पर्मिशन्स विचारतात याकडे नेहमी लक्ष दिले पाहिजे. उदाहरणार्थ- तुम्ही एडिटिंग ॲप डाऊनलोड केल्यास ते ॲप तुम्हाला स्टोरेज, कॅमेरा, मायक्रोफोन आणि फोटो गॅलरी यासाठी परवानगी मागते. पण त्या ॲपला कोणत्या परवानग्या हव्यात याकडे तुम्हाला लक्ष द्यावे लागेल. जेव्हाही आपण एखादे ॲप डाऊनलोड करतो तेव्हा त्याचे रिव्ह्यू नक्की वाचा. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण, लोक त्यांच्या ॲपच्या अनुभवावर आधारित रिव्ह्यू देतात. तुम्हाला ॲपचे वाईट रिव्ह्यू आढळल्यास ॲप डाऊनलोड करू नका.

जेव्हा तुम्ही एखादे ॲप डाऊनलोड करता, त्याआधी ते ॲप किती वेळा डाऊनलोड केले आहे ते पहा. ही तपासणी करणेदेखील महत्त्वाची आहे. कारण, जितक्या जास्त लोकांनी ॲप डाऊनलोड केले आहे तितकाच ॲपवर अधिक विश्वास निर्माण होतो.

गुगल प्ले स्टोअरवर प्रत्येक ॲप निर्माता त्यांच्या ॲपबद्दल तपशील देतो. त्याचा स्त्रोत काय आहे हेदेखील सांगतो. जर तुम्हाला स्त्रोत योग्य वाटत असेल किंवा तपशील बरोबर असतील तरच ॲप डाऊनलोड करा.

# धकाधकीच्या जीवनात ग्रीन टीचे फायदे

**आजचे** धकाधकीचे जीवन, बदलती जीवनशैली, बदलते आहार यांमुळे अनेक आजार डोकं वर काढत आहेत. एवढंच नाही तर वाढत्या कामाच्या तणावामुळे गेल्या काही वर्षांपासून ग्रीन टी नियमित पिणाऱ्यांच्या संख्येतसुद्धा वाढ होताना दिसत आहे. योग्य आणि नियमित प्रमाणात ग्रीन टीचे सेवन शरीरास हितकारक ठरू शकते.




परंतु ग्रीन टीचे प्रमाणाबाहेर सेवन केल्यास ते आरोग्यास घातकदेखील ठरू शकते. ग्रीन टीमध्ये थेनाईन तत्त्व जास्त प्रमाणात असतात, त्यामुळे अमिनो ॲसिड बनते. अमिनो ॲसिड शरीरात ताजेपणा कायम ठेवण्यास मदत करते. तसेच तुम्हाला थकवा जाणवत नाही. सध्या तरुणांमध्ये आणि वृद्धांमध्ये कॅव्हिटीच्या समस्या वेगाने वाढत आहेत. ग्रीन टीमध्ये कॅफीन असते जे दातांवरील किटाणू मारण्यास सक्षम असते. बॅक्टेरिया कमी झाल्याने अधिक काळापर्यंत तुमचे दात चांगले राहतात. सतत वाढत्या कामामुळे, दररोजच्या व्यस्त वेळापत्रकामुळे रक्तदाबाच्या समस्यांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. रक्तदाबाचा त्रास असल्यास त्यावर ग्रीन टी फायदेशीर आहे. त्याचप्रमाणे हृदयरोग असणाऱ्यांसाठी ग्रीन टीचे सेवन फायदेशीर ठरते. वजन कमी करण्यासाठी ग्रीन टी उपयोगी ठरते. ग्रीन टी प्यायल्याने शरीरातील मेटाबॉलिज्म रेट वाढतो ज्यामुळे पाचनक्रिया सुरळीत होते.



# पिअर्सिंग करताना द्या 'या' गोष्टींकडे लक्ष

बाजारामध्ये सध्या नवनवीन फॅशनचा ट्रेण्ड येत आहे. प्रत्येक ऋतूप्रमाणे हा ट्रेण्ड बदलत जातो. विशेष म्हणजे आजची तरुणाईदेखील हा फॅशन ट्रेण्ड उत्तमरित्या कॅरी करताना दिसत आहे. त्यातच मग पाहायला गेलं तर आज प्रत्येक तरुणाईच्या अंगावर टॅटू किंवा पिअर्सिंग दिसून येतात. अनेक जण आवड म्हणून तर काही जण केवळ फॅशन म्हणून या गोष्टी करतात. सध्या तरुणाईमध्ये पिअर्सिंगची मोठ्या प्रमाणावर क्रेझ दिसून येत आहे. मात्र, पिअर्सिंग करताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली पाहिजे. पिअर्सिंग म्हणजे शरीरावरील काही भागांवर रिंग किंवा अन्य एखादा दागिना टोचून घेणे. यामध्ये अनेक जण कान, नाक, भुवयी किंवा ओठांवर टोचून घेतात. मात्र, अनेक वेळा शरीरावर टोचून घेतल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष केल्यास अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.



- **संसर्ग होणे –**

पिअर्सिंग करताना विशेष काळजी घेतली पाहिजे. त्यासोबतच एखाद्या एक्सपर्ट व्यक्तीकडून हे करून घ्यावं. कारण अनेक वेळा हलगर्जीपणामुळे पिअर्सिंग करताना रक्तात संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे जर संसर्ग झाल्याची शक्यता निर्माण झाल्यास त्वरित डॉक्टरांकडे जावे.

- **ॲलर्जी होणे–**

विशिष्ट धातूंचा वापर करून शरीरावर बॉडी पिअर्सिंग करण्यात येतं. काही जणांची त्वचा सेन्सेटिव्ह असते. त्यामुळे अशा व्यक्तींना या धातूपासून ॲलर्जी होण्याची शक्यता असते. त्यामुळे अनेक वेळा बॉडी पिअर्सिंग केल्यानंतर सूज येणे, रॅशेस येणे यासारख्या समस्या निर्माण होतात.

- **अतिरिक्त रक्तस्त्राव–**

बॉडी पिअर्सिंग करतान कधी कधी सुई चुकीच्या ठिकाणी टोचली जाते. परिणामी, अशा ठिकाणाहून रक्तस्त्राव होण्यास सुरुवात होते. त्यामुळे पिअर्सिंग करताना विशेष काळजी घेण्याची गरज असते.

- **तज्ज्ञ व्यक्तीकडून पिअर्सिंग करावे –**

पिअर्सिंग कधीही या क्षेत्रातील तज्ज्ञ किंवा योग्य प्रशिक्षित व्यक्तीकडून करून घ्यावं. कमी अनुभवी व्य तकडून पिअर्सिंग करून घेतलं. तर त्याचा थेट परिणाम तुमच्या शरीरावर होऊ शकतो. चुकीच्या ठिकाणी पिअर्सिंग करून घेतल्या तर या ठिकाणचा भाग मृत होण्याची शक्यता असते.

# काळे, दाट, सुंदर केसांसाठी ऑलिव्ह ऑइलचा वापर

**जास्त उन्हात केसांच्या अनेक समस्या निर्माण होतात. शरीराची विशेष काळजी घेणं या वेळी गरजेचं असतं. गर्मीमुळे घाम, ओलसरपणामुळे केस अधिकच खराब व्हायला लागतात. त्यात बदललेल्या जीवनशैलीचा आणि खाण्या-पिण्याचा परिणाम... अशात केसांची योग्य ती काळजी घेणं गरजेचं असतं... त्यासाठी ऑलिव्ह ऑईल उपयुक्त आहे.**

- ऑलिव्ह ऑइलनं केसांची मसाज करा, हे एक उत्तम कंडिशनर आहे.
- ऑलिव्ह ऑइल एक अँटी ऑक्सिडेंटचं काम करतं. त्यामुळं डँड्रफ आणि केस पांढरे होण्यापासून वाचतात.
- जर आपण केसांसाठी होममेड ट्रिटमेंट घेऊ इच्छिता तर ऑलिव्ह ऑइल बेस्ट आहे. ते आपले केस हेल्दी करतात.
- ऑलिव्ह ऑइलमध्ये मोनो सॅच्युरेटेड फॅटी ॲसिड असतं. जे केसांना नैसर्गिक ओलावा देतं.
- ऑलिव्ह ऑइल त्वचेसाठीही फायद्याचे आहे. यानं मालिश केल्यास त्वचेतील ओलावा टिकून राहतो.





# डायबेटिसपासून स्वताचे रक्षण करण्यासाठी हे टाळा

**सध्या जगातील सर्वात जास्त भेडसावणारी समस्या म्हणजे डायबेटिस... जगात भारत हा डायबेटिसचा मोठा बळी आहे. भारतात डायबेटिसग्रस्त लोकांची संख्या नवनवे आकडे पार करतेय. डायबेटिस पूर्णपणे बरा करता येत नसला तरी काही प्रमाणात रोखला जाऊ शकतो. त्यापासून स्वत:चे रक्षण करता येते. त्यामुळे तुम्ही या विकाराचे बळी होऊ नये म्हणून काही काळजी घेणे आवश्यक आहे.**



- **वजन घटवा**

तुम्ही जर स्थूल असाल तर तुमचे वजन कमी करण्याचा प्रयत्न करा. जास्त वजन हे डायबेटिस होण्यासाठी पूरक असते. वजन घटवल्याने शरीरात तयार होणाऱ्या इन्शुलिनमध्ये वाढ होते आणि त्यामुळे मधुमेहाचा धोका कमी होण्यास मदत होते.

- **नाश्ता करा**

सकाळी उठल्यानंतर दोन ते तीन तासांत नाश्ता करण्याची सवय स्वतःला लावून घ्या. यामुळे डायबेटिसचा धोका कमी होण्यास मदत होते. नाश्ता करणे अजिबात टाळू नका.

- **तंतूमय (फायबर) पदार्थांचे सेवन करा**

आहारात फळे, भाज्या, डाळी आणि टणक कवचाच्या फळांचा समावेश करा. तंतूमय पदार्थांचा आहारात समावेश असणे फार गरजेचे आहे. आहारातून शरीरात येणाऱ्या शर्करेचे प्रमाण कमी करण्यास हे पदार्थ मदत करतात.

- **शारीरिक व्यायाम**

नियमित व्यायाम करणे तुमच्या आरोग्यासाठी गरजेचे आहे. व्यायामामुळे केवळ वजन कमी होते असे नाही, तर शरीरात उत्पन्न होणारे इन्शुलिन योग्य पद्धतीने वापरले जाते. त्यामुळे डायबेटिसचा धोका कमी होतो.

- **धूम्रपान टाळा**

तुम्ही जर धूम्रपान करत असाल तर ते आताच बंद करा. टाईप २ चा डायबेटिस धूम्रपानामुळे होण्याची मोठ्या प्रमाणात शक्यता असते. त्यामुळे या कारणाला बगल देणे गरजेचे आहे.



# हँड ड्रायरखाली हात सुकवणं धोकादायक, जाणून घ्या याचे कारण




**हॉटेल, थिएटरमध्ये, 'हँड ड्रायर'खाली हात सुकवणं सर्वाधिक धोकादायक असल्याचं एका संशोधनातून समोर आलंय. टॉयलेटमध्ये हँड ड्रायरमुळे हात आणि शरीरावर बॅक्टेरिया चिकटण्याची शक्यता जास्त असून तज्ञ डॉक्टरांनी याला दुजोरा दिला आहे.**

**विमानतळ,** रेस्टॉरंट, कॉर्पोरेट ऑफिस किंवा शहरातील काही टॉयलेटमध्ये हात सुकवण्यासाठी हँड ड्रायरचा वापर केला जातो. ओले हात सुकवण्यासाठी हँड ड्रायरखाली काही सेकंद हात धरले जातात. त्यामुळे हात कोरडे होतात. पण अशा पद्धतीने हात सुकवणं आरोग्यासाठी घातक आहे. ॲप्लाईड आणि इन्वॉयर्नमेंटल मायक्रोबायोलॉगी जर्नलमध्ये छापण्यात आलेल्या एका संशोधनानुसार, हँड ड्रायरखाली हात सुकवल्याने आपल्या स्वच्छ हातावर पुन्हा जंतू किंवा बॅक्टेरिया बसण्याची शक्यता असते. ड्रायरच्या वापरामुळे हवेतील 'बॅक्टेरियल पॉथजीन्स स्पोअर्स' धारांमध्ये शिरू शकतात. ज्यामुळे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. हँड ड्रायरच्या वापराने हातावर अधिक बॅक्टेरिया येण्याची शक्यता असते.

टॉयलेटमध्ये असणाऱ्या हवेत फ्लोटिंग बॅक्टेरिया असतात. त्यापैकी आपण हँड ड्रायरचा वापर करतो, त्या वेळी ते बॅक्टेरिया हातावर चिकटण्याची शक्यता असते. या बॅक्टेरियामुळे अनेक आजारही होऊ शकतात, असं सेंट जॉर्ज रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मधुकर गायकवाड यांनी सांगितलं.

सशोधकांनी एक प्लेट ३० सेकंद हँड ड्रायरखाली धरली. या प्लेटवर १८ ते ६० विविध बॅक्टेरिया जमा झालेले दिसले. पण हँड ड्रायरच्या आतील बाजूस मात्र कमी प्रमाणात बॅक्टेरिया होते. हँड ड्रायर बंद करूनही प्लेट दोन मिनिटे धरली. त्या प्लेटवर कमी प्रमाणात बॅक्टेरिया आढळून आले. ही प्लेट पुन्हा टॉयलेटमध्ये फॅन सुरू ठेवून २० मिनिटे धरण्यात आली. या प्लेटवर १५ बॅक्टेरिया सापडले. मात्र, या मशीनशिवाय आपण टॉवेल किंवा टिशू वापरु शकतो आणि या मशीनचा वापर टाळू शकतो, असा सल्ला तज्ज्ञांनी दिलाय.

# वसई-विरार महापालिकेत आरक्षण सोडत जाहीर... ५८ जागा महिलांसाठी राखीव




**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

वसई-विरार शहर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक आरक्षण सोडत मंगळवारी जाहीर झाली. एकूण ११५ जागांपैकी तब्बल ५८ जागा महिलांसाठी आरक्षित झाल्याने या निवडणुकीत महिला उमेदवारांना मोठी संधी उपलब्ध झाली आहे. महिला आरक्षण आणि राखीव जागांमुळे सर्वसाधारण गटातील अनेक पुरुष उमेदवारांना मोठा फटका बसला आहे.

आरक्षण सोडतीनुसार २९ प्रभागांपैकी १७ प्रभागात सर्वसाधारण पुरुषांसाठी केवळ एकाच जागेची संधी उपलब्ध झाली आहे, तर प्रभाग क्रमांक २० मध्ये सर्वसाधारण पुरुष उमेदवाराला एकही जागा उपलब्ध नाही. ही सोडत विरार पश्चिम येथील महापालिका मुख्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते पार पडली.

यावेळी प्रभारी आयुक्त व जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, उपायुक्त स्वाती देशपांडे, अजित मुठे, अर्चना दिवे, सहाय्यक आयुक्त विश्वनाथ तळेकर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**एकूण आरक्षण रचना**

- ● एकूण जागा : ११५
- ▶ एससी : ५ जागा
- ▶ एसटी : ५ जागा
- ▶ ओबीसी : ३१ जागा
- ▶ सर्वसाधारण : ७४ जागा
- ▶ महिला आरक्षण (५०%) : ५८ जागा

आरक्षण १ जुलै २०२५ पर्यंतच्या मतदार याद्यांवर आधारित निश्चित करण्यात आले.

**सर्वसाधारण पुरुषांना मोठा धक्का**

आरक्षण सोडतीनंतर अनेक प्रभागांमध्ये सर्वसाधारण पुरुष उमेदवारांसाठी जागा अत्यल्प असल्याचे स्पष्ट झाले आहे. २९ पैकी १७ प्रभागांमध्ये सर्वसाधारण गटातील पुरुषांसाठी फक्त एकच जागा

**प्रभाग क्रमांक २० मध्ये एकही जागा नाही**

● प्रभाग क्रमांक २० चे विश्लेषण :
- ▶ अ - आरक्षित (अनुसूचित जाती)
- ▶ ब - आरक्षित (अनुसूचित जमाती)
- ▶ क - ओबीसी (महिला)
- ▶ ड - सर्वसाधारण (महिला)

म्हणजे या प्रभागात सर्वसाधारण पुरुष उमेदवाराला पूर्णतः संधी नाही. अनेक संभाव्य उमेदवारांना आता शेजारील किंवा पयार्यी प्रभाग शोधावा लागणार आहे.

**महिलांसाठी प्रवर्गनिहाय राखीव जागा**

- ▶ अनुसूचित जाती (एससी महिला): १४-अ, १-अ, १९-अ
- ▶ अनुसूचित जमाती (एसटी महिला): २५-अ, १९-ब, २७-अ
- ▶ डइउ महिला (महत्त्वाच्या १५ जागा): १२-अ, २३-अ, १-ब, २०-क, २१-ब, ४-अ, ७-अ, ६-अ, ९-अ,२-अ, १५-अ, २६-अ, १३-अ, १७-अ, ८-अ, २९-अ
- ▶ सर्वसाधारण (जनरल महिला): १-क, २-ब, ३-ब, ३-क, ४-ब, ५-ब, ५-क, ६-ब, ७-ब, ८-ब, ९-ब ९-ब १०-क, ११-क, १२-क, १३-ब, १४-क, १५-ब, १६-ब, १६-क, १७-ब, १८-ब, १८-क, २०-ड, २१-क, २२-ब, २२-क, २३-क, २४-ब, २४-क, २५-क, २६-ब, २७-क, २८-ब, २८-क, २९-ब

# निवडणुका जाहीर होताच निवडणूक चिन्हांचं वाटप, ठाकरे, शिंदे, पवार गटाला कोणतं चिन्ह?

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीचे बिगुल वाजले असून अखेर तारखा घोषित झाल्या आहेत. गेल्या आठवड्यात निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत आगामी निवडणुकांची तारीख घोषित केली. त्यानुसार, येत्या दोन डिसेंबर रोजी राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे, तर तीन डिसेंबर रोजी निवडणुकीचा निकाल लागणार आहे.

निवडणुकीचे बिगुल वाजताच सर्वच पक्षांनी कंबर कसून तयारी सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर आता एक महत्वाची माहिती समोर येत आहे. शिवसेना-राष्ट्रवादी दोन गटांसह राज्यातील ४३५ पक्षांची नवी यादी




निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आली असून निवडणूक चिन्हांचं वाटप करण्यात आलं आहे. 'तुतारी' आणि 'मशाल' चिन्हांना स्थान देण्यात आलं आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मशाल आणि तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्हे कायम ठेवण्यात आली आहेत.

**यादी जाहीर, कोणाला मिळालं**

**आरक्षण जाहीर झाल्यानंतर इच्छुकांचा जल्लोष आणि प्रचाराला सुरुवात**

आरक्षण जाहीर झाल्यानंतर इच्छुकांचा जल्लोष आणि प्रचाराला सुरुवात झाली आहे. ठाकरेंच्या सेनेचे माजी नगरसेवक सचिन पडवळ यांच्या पदाधिकाऱ्यांकडून शिवडीमध्ये जल्लोष करण्यात आला. शिवडीतील प्रभाग क्रमांक २०६ सर्वसाधारण गटासाठी जाहीर झाल्याने पदाधिकाऱ्यांनी जल्लोष केला. सचिन पडवळ हे २०१७ साली याच प्रभागातून निवडून आले आहेत. हा प्रभाग आरक्षित न होता सर्वसाधारण गटासाठी जाहीर झाल्याने पून्हा सचिन पडवळ यांचा निवडणूक लढण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, म्हणून स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सचिन पडवळ यांचे अभिनंदन करून जल्लोष केला.

**कोणतं चिन्हं?**

महाराष्ट्रातील ५ राज्यस्तरीय पक्ष आणि इतर राज्यांतील ९ राज्यस्तरीय पक्षांचा समावेश करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या ४१६ राजकीय मान्यताप्राप्त असलेल्या पक्षांच्या चिन्हांसहित यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. दरम्यान या यादीमध्ये शिवसेना (ठाकरे) पक्षाचे 'मशाल' चिन्ह, शिवसेना (शिंदे) पक्षाचे 'धनुष्यबाण' चिन्ह, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे 'घड्याळ' आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचा 'तुतारी वाजवणारा माणूस' या चारही चिन्हाना नावांसहित वेगळे स्थान देण्यात आले आहे. मात्र दोन्ही राजकीय पक्षांच्या चिन्ह आणि नावावरील वादाचा अंतिम निर्णय हाँ सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर अवलंबून आहे, असे आयोगाने स्पष्ट केले आहे.

**राष्ट्रवादीला मोठा दिलासा**

न्यायालयाच्या आदेशानंतर आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेसला (शरद पवार) तुतारी वाजवणारा माणूस हे निवडणूक चिन्ह दिले. पण लोकसभा निवडणुकीत तुतारी वाजवणारा माणूस आणि पिपाणी अशी दोन चिन्ह असल्याने मत विभाजन झालं, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात आला होता. त्यामुळे पिपाणी हे चिन्ह काढून टाकण्याची मागणीही केली होती. अखेर आयोगाने जाहीर केलेल्या राजपत्रात आता पिपाणी हे चिन्ह वगळून टाकण्यात आलं असून फक्त तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह कायम ठेवण्यात आलं आहे. आयोगाच्या या निर्नयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला (शरद पवार गट) मात्र मोठा दिलासा मिळाला आहे.


## शासकीय कार्यालयांमुळे बीएमसीला फटका

## थकवला तब्बल ₹.१८०० कोटींचा मालमत्ता कर

| प्राधिकरण | प्रकरणे | थकबाकी |
|---|---|---|
| एमएमआरडीए | १२७ | ९२९७९७६८५२ |
| म्हाडा प्राधिकरण | ३६१२ | ३६८५५८९९६७ |
| पोलीस आयुक्त | ४१४ | ७१४३४२६६२ |
| राज्य सरकार | ७३६ | २२१८५७८०१७ |
| केंद्र सरकार | ४१५ | २०८६८७६६०२ |

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई शहरातील राज्य सरकारच्या विविध शासकीय कार्यालयाने मुंबई महापालिका प्रशासनाचा सुमारे १८०० कोटी ३३ लाख रुपयांचा मालमत्ता कर थकविला आहे. यामुळे महापालिकेच्या महसुलांवर परिणाम होत असून तो भरण्याकडे सरकारी यंत्रणा दुर्लक्ष करत असल्याचे पालिका सूत्रांनी सांगितले.



जकात बंद झाल्यावर मुंबई महापालिकेच्या महसुलाचा मुख्य स्रोत मालमत्ता कर राहिला आहे.

परंतु अनेक शासकीय यंत्रणा हा कर भरण्यासाठी उदासीनता दाखवत आहेत. नुकतीच करनिर्धारण विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार एमएमआरडीएने ९२९ कोटी ७९ लाख ७६ हजार ८५२ रुपये, म्हाडा प्रशासनाने ३६८ कोटी ५५ लाख ८९ हजार ९६७ रुपये, मुंबई पोलीस विभाग ७१ कोटी ४३ लाख ४२ हजार ६६२ रुपये, राज्य सरकारी कार्यालये २२१ कोटी ८५ लाख ७८ हजार ०१७ रुपये, तर केंद्र सरकारची कार्यालये २०८ कोटी ६८ लाख ७६ हजार ६०२ रुपये अशाप्रकारे या सर्व शासकीय कार्यालयांनी महापालिका मालमत्ता कर थकविलेला आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेचे हजारो कोटींचे नुकसान होत आहे.

# न्यू माहीम शाळेची पुनर्बांधणी आहे त्याच जागेवर होणार... बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाची स्पष्टोक्ती



**■मुंबई। प्रतिनिधी,**

न्यू माहीम सेकंडरी शाळेची इमारत अतिधोकादायक स्थितीत असल्याचे कारण देत शाळा पाडण्याचा घाट पालिकेने घातला आहे. पालिकेच्या निर्णयाला स्थानिकांनी, संघटनांनी विरोध केला आहे. संघटनाच्या विरोधानंतर पालिका प्रशासनाने यावर स्पष्टोक्ती देत माहीम शाळेची इमारत आहे त्याच ठिकाणी पुनर्बांधणी केली जाणार आहे, असे सांगितले आहे. पालिका प्रशासनाने न्यू माहीम शाळेवर बुलडोझर चालवू नये, यासाठी रविवारी काही संघटना एकत्र पालिकेच्या या निर्णयाला तीव्र विरोध केला होता.

**पालिकेचा दावा काय?**

प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, मुंबई महानगरपालिकेच्या ह्यजी उत्तरह्व विभागातील न्यू माहीम महानगरपालिका शालेय इमारतीचे महानगरपालिकेच्या शाळा पायाभूत सुविधा कक्षामार्फत संरचनात्मक लेखापरीक्षण करण्यात आले. त्यामध्ये ही इमारत सी१ श्रेणीत म्हणजेच अतिधोकादायक इमारत म्हणून घोषित करण्यात आली. पालक तसेच लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार न्यू माहीम महानगरपालिका शालेय इमारतीचे त्रयस्थ सल्लागार संस्थांमार्फत देखील संरचनात्मक लेखापरीक्षण करण्यात आले. या संरचनात्मक लेखापरीक्षणातदेखील ही इमारत 'अतिधोकादायक' असल्याचे निष्पन्न झाले आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लालगार समितीने देखील ही शालेय इमारत अतिधोकादायक असल्याबाबतचे आदेश दिले आहेत.

# ६ वर्षीय मुलीवर २० वर्षीय तरुणाकडून लैंगिक अत्याचार

**■नांदेड। प्रतिनिधी,**

नांदेडमध्ये अतिशय भयानक प्रकार घडला आहे. एका सहा वर्षीय मुलीवर २० वर्षीय युवकाने अत्याचार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अत्याचार केल्याची संतापजनक घटना नांदेड जिल्हयातील मुखेडमध्ये घडली आहे. ही घटना शुक्रवारी ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता घडली आहे. ६ वर्षीय मुलीवर २० वर्षीय युवकाने अत्याचार केले. या घटनेनंतर मुलीच्या पालकांमध्ये भितीचं वातावरण आहे. तसेच परिसरातील जमाव संतप्त झाला आहे. खंडोबा गल्लीत राहणारी अल्पवयीन मुलगी ट्युशनवरुन घरी परतत होती. त्यावेळी नारलावार गल्लीत राहणारा २० वर्षीय आरोपी ओंकार डाकुरवार हा तरुण तेथे उपस्थित होता. आरोपी त्याच्या बांधकाम सुरु




असलेल्या घरात मुलीला घेऊन गेला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी ओमकार डाकूरवार याला पोलीसांनी तातडीने अटक केली. पीडित बालिका खाजगी क्लासेसवरुन घरी जात असताना आरोपी ओमकार डाकुरवार याने तिला बळजबरीने उचलून बांधकाम सूरू असलेल्या घरी नेले. तिथे या चिमुकलीवर अत्याचार केले. दरम्यान या घटनेच्या निषेधार्थ नागरिकांनी मुखेड पोलीस ठाण्यावर मुक मोर्चा काढला. आमदार तुषार राठोड हे सुद्धा मोर्चात सामील झाले होते. यावेळी ठाण्यात नागरिकानी ठिय्या केला. हा खटला जलद गती न्यायालयात चालवावा, आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी नागरिकानी केली. दरम्यान तीन दिवसात प्रकरणाचा तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात सादर करणार असल्याचे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

**नांदेड सिटी परिसरात एका तरुणीचा पाठलाग करत तिच्याशी अश्लील वर्तन करण्यात आलं आहे. विश्रांतवाडी परिसरात शाळकरी मुलीला दुचाकीवर फिरवण्याच्या बहाण्याने तिच्यासोबत एका व्यक्तीने गैरवर्तन केलं. या दोन्ही प्रकरणांमध्ये पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींना ताब्यात घेतलं आहे. तसंच सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने एका आरोपीचा शोध सुरू आहे. या घटनांवरुन महिला सुरक्षित आहेत का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

# लग्नमंडपात नवरदेवावर चाकू हल्ला, बायको स्टेजवर बेशुद्ध!

## १ किलोमीटरपर्यंत ड्रोन कॅमेराने पाठलाग... थरारक ड्रोनकॅमेऱ्यातमध्ये कैद

**■पुणे। प्रतिनिधी,**

अमरावतीमध्ये एक थरारक घटनाक्रम घडला असून आश्चर्याची बाब म्हणजे हल्लेखोर चक्क ड्रोन व्हिडीओमध्ये कैद झाला आहे. येथील बडनेरा रोडवरील साहिल लॉनमध्ये सुरू असलेल्या लग्नसमारंभात रात्री अचानक नवरदेवावर काही इसमांनी हल्ला केला. या हल्ल्यात नवरदेव गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सध्या उपचार सुरु आहेत. मात्र हल्ल्याचा संपूर्ण थरार लग्नाच्या शुटींगसाठी वापरण्यात आलेल्या ड्रोन कॅमेरात कैद झालाय.



**नवरदेवावर हल्ला**

अमरावतीच्या बडनेरा रोडवरील साहिल लॉनमध्ये सुरू असलेल्या लग्नसमारंभात काल रात्री अचानक गोंधळ उडाला. साहिल लॉन येथे बडनेरा येथील सुजलराम समुद्रे या तरुणाचा विवाहसमारंभ सुरू असताना या लग्न समारंभात एक विचित्र प्रकार घडला. दोन युवकांनी नवरदेव सुजलराम समुद्रे याच्यावर धारदार चाकूने हल्ला केला. या हल्ल्याचे ड्रोन व्हिडिओ समोर आले.

**बायको बेशुद्ध पडली**

अचानक झालेल्या या हल्ल्यात नवरदेव सुजलराम जखमी झाला. नवऱ्याला रक्ताच्या थारोळ्यात पाहून नववधू जागेवर चक्कर येऊन पडली. मुलावर हल्ला झाल्याचं पाहताच नवरदेवाचे वडील आरोपींना पकडायला त्यांच्या मागे धावले.

**नवरदेवाच्या वडिलांनी केला पाठलाग**

अगदी मंडपाच्या बाहेरपर्यंत नवरदेवाच्या वडिलांनी हल्लेखोरांचा पाठलाग केला. मात्र नवरदेवाचे वडील आपल्या पाठी येत असल्याचं पाहून हल्लेखोरांनी त्यांच्यावर देखील हल्ला करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्नही ड्रोन कॅमेरामध्ये कैद झाला आहे. दोन हल्लेखोर आरोपी दुचाकी वाहनावर बसून पळून गेले. मात्र हल्ला झाल्यापासून ते अगदी बाईकवर बसून हायवेवरुन पळून गेलेल्या हल्लेखोरांचा संपूर्ण व्हिडिओ ड्रोन कॅमेरात कैद झाला.

**नवरदेव गंभीर जखमी**

**परिसरात एकच खळबळ**

**या आरोपीचा शोध आता बडनेरा पोलीस घेत असून यापूर्वी देखील बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही आरोपींनी धाब्यावर महिलेस मारहाण केली होती. त्यामुळे बडनेरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांचा गुन्हेगारावर वचक राहिला नाही का असा प्रश्न निर्माण होत आहे.**

या हल्ल्यात नवरदेव गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने उपचारासाठी रिम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर लग्नसमारंभात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच बडनेरा पोलिस घटनास्थळी दाखल झाले आणि तपास सुरू केला आहे. प्राप्त माहितीनुसार जखमी सुजल समुद्रे हा टिळक नगर परिसरातील रहिवासी आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# सुधीर फडके पुलाखाली ओढून नेलं आणि... २९ वर्षीय तरुणीवर दिवसाढवळ्या अत्याचाराचा प्रयत्न

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईत २९ वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना सोमवारी संध्याकाळी घडली. बोरिवली पश्चिम येथील सुधीर फडके पुलाखाली हा प्रकार झाल्याचे समोर आले आहे. महिला कामावर जात असताना एका व्यक्तीने तिला अडवून पुलाखाली एका निर्जनस्थळी नेले. तिच्यासोबत अश्लील प्रकार करण्याचा प्रयत्न केला. स्वतःचा जीव वाचवण्यासाठी घाबरलेल्या महिलेने आरोपीला तिचे सोन्याचे दागिने आणि मोबाईल फोन दिला. त्यानंतर कशीबशी सुटका करुन घेत तिने बोरिवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पोलिसांनी गुन्हा दाखल केल्यानंतर झोन ११ चे पोलीस उपआयुक्त संदीप जाधव यांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी एक विशेष पथक तयार केले. रात्रभर चाललेल्या शोध मोहिमेनंतर, उपनिरीक्षक तुषार सुखदेव यांच्या नेतृत्वाखालील मालवणी पोलीस शोध पथकाने



काही तासांतच आरोपीला पकडले आणि बोरिवली पोलिसांच्या ताब्यात दिले.

पोलिसांनी आरोपीकडून महिलेचे कानातले, सोन्याची अंगठी, रियलमी सी-५५ मोबाईल फोन आणि हेडफोन यांसारख्या वस्तू जप्त केल्या आहेत. या मुद्देमालाची अंदाजे किंमत ५२,००० रुपये आहे. आरोपीची ओळख पटली असून त्याचे नाव संजय राजपूत आहे. तो दहिसरमधील प्रेम नगर येथील रहिवासी आहे. तो हॉटेलमध्ये भांडी धुण्याचे आणि रस्ते झाडण्याचे काम करुन आपला उदरनिर्वाह करत असल्याचे समजते. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

बोरिवली पश्चिम येथील सुधीर फडके पुलासारख्या गजबजलेल्या परिसरात घडलेल्या अत्याचाराच्या प्रयत्नाच्या घटनेने मुंबईकरांना हादरवून सोडले आहे. पीडित महिला कामावर जात असताना आरोपीने तिला पुलाखाली ओढून नेले आणि तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. महिलेने प्रसंगावधान राखून आपल्याकडील मौल्यवान वस्तू देऊन स्वतःचा जीव वाचवला. त्यानंतर ती तातडीने पोलिसांकडे पोहोचली आणि घडलेला प्रकार सांगितला.

पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीचा शोध सुरू केला. आरोपी संजय राजपूतला अटक केल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली. या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# माजी अधिकाऱ्यासह कंपनी संचालकाला तुरुंगवास

## विजया बँकेची २६ कोटी रुपयांची फसवणूक, विशेष सीबीआय न्यायालयाचा निकाल

**■मुंबई। प्रतिनिधी,**

विजया बँकेच्या माजी सहाय्यक महाव्यवस्थापक आणि कंपनी संचालकाला सीबीआय न्यायालयाने २००८ मधील २६ कोटी रुपयांच्या बँक फसवणुकीच्या प्रकरणात गुन्हेगारी कट रचणे आणि फसवणूक केल्याच्या आरोपाखाली दोषी ठरवले. १२ वर्षे खटला चालल्यानंतर न्यायालयाने हा निकाल दिला. याचवेळी दोषींना उच्च न्यायालयात अपिल दाखल करण्याची संधी देत न्यायालयाने शिक्षेला महिन्याची स्थगिती दिली. रोशन इलेक्ट्रिकल कंपनी प्रायव्हेट लिमिटेडच्या संचालक अनिता मथियास यांना तीन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा आणि १ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. त्यांनी ही रक्कम वैयक्तिक मिळवली होती. तसेच विजया बँकेच्या गोरेगाव शाखेचे माजी सहाय्यक महाव्यवस्थापक के. श्रीधर शेट्टी यांना एक वर्षाचा साधा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. विशेष सीबीआय न्यायाधीश अमित खारकर यांनी दोन्ही आरोपींनी दोषी ठरवून शिक्षा सुनावली. हा फसवणुकीचा गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून त्याचा बँकिंग क्षेत्रावर परिणाम होतो. त्यामुळे अशा गुन्ह्यातील आरोपींना कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे, असे न्यायालयाने नमूद केले आहे. अनिता मथियासने शेट्टीसोबत कट रचून बँकेच्या निधीचा गैरवापर केल्याचे उपलब्ध पुराव्यांवरून स्पष्ट झाले. न्यायालयाने बचाव पक्षाच्या विनंतीवरून दोन्ही शिक्षांना एक महिन्यासाठी स्थगिती दिली, कारण दोषींना उच्च न्यायालयात अपील दाखल करता येईल.

**हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com**

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com